खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

**राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे**

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२१ – २२

**सहकामहर्षी साहेबरावजी सातकर यांच्या पूर्णाकृती पुतळा अनावरण आणि हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या विस्तारित इमारत भूमीपूजन कार्यक्रम**

पुढारी

# खा. शरद पवार यांचे शनिवारी खेड तालुक्यात विविध कार्यक्रम

**राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा**

ज्येष्ठनेते खासदार शरद पवार यांच्या उपस्थितीत शनिवारी (दि. २५) खेड तालुक्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तालुक्याचे माजी आमदार, सहकारमहर्षी साहेबराव तथा आप्पासाहेब सातकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण, हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या विस्तारित नवीन इमारतीचे भूमिपूजन, शेतकरी मेळावा असे कार्यक्रम होणार आहेत. याकडे तालुक्याचे लक्ष लागून आहे.

- **साहेबराव सातकर पुतळ्याचे अनावरण**
- **हुतात्मा राजगुरू विद्यालय इमारतीचे भूमिपूजन, शेतकरी मेळावा**

खेड तालुका सहकारी खरेदी-विक्री संघ व खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. खासदार शरद पवार यांच्या सह गृहमंत्री दिलीप वळसे पाटील, सहकार व पणन मंत्री बाळासाहेब पाटील, राज्यमंत्री दत्तात्रय भरणे, खासदार डॉ. अमोल कोल्हे, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, आमदार दिलीप मोहिते पाटील आदी मान्यवर या वेळी उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी बुधवारी (दि. २२) पत्रकार परिषदेत दिली. संचालक बाळासाहेब सांडभोर, सतीश नाईकरे पाटील, राजेंद्र टाकळकर, रानमळाचे माजी सरपंच अरविंद दौंडकर, प्रबंधक कैलास पाचारणे, प्राचार्य व्ही. डी. कुलकर्णी, प्राचार्य एच. एम. जरे, प्रा. डॉ. संजय शिंदे आदी या वेळी उपस्थित होते.

My Gramin Edition
Dec 23, 2021 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

# सातकर यांच्या पुतळ्याचा शनिवारी अनावरण सोहळा

## ज्येष्ठ नेते शरद पवार उपस्थित राहणार

**राजगुरुनगर, ता. २२ :** खेड तालुका सहकारी खरेदी-विक्री संघ आणि खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाने शनिवारी (ता. २५) दुपारी १ वाजता सहकारमहर्षी साहेबरावजी सातकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण व हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या विस्तारित नूतन इमारतीचे भूमिपूजन आणि शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

हा कार्यक्रम ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या हस्ते आणि गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आणि सहकारमंत्री बाळासाहेब पाटील, राज्यमंत्री दत्तात्रेय भरणे, खासदार डॉ. अमोल कोल्हे, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, आमदार दिलीप मोहिते आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत होणार असल्याची माहिती खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष राजाराम लोखंडे यांनी दिली. याप्रसंगी संस्थेचे संचालक बाळासाहेब सांडभोर, राजेंद्र टाकळकर, सतीश नाईकरे, प्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते.

पुणे-नाशिक महामार्गावरील खरेदी-विक्री संघाच्या पेट्रोल पंपावर सहकारमहर्षी साहेबराव सातकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण होणार आहे. त्यानंतर महाविद्यालयाच्या नूतन इमारतीचे भूमिपूजन होणार आहे. महाविद्यालयाच्या मैदानावर शेतकरी मेळाव्याचे आयोजन केले आहे.

**दै. सकाळ**

लोकमत

# खेडमध्ये शरद पवारांच्या उपस्थितीत शेतकरी मेळावा

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरूनगर :** खेड तालुका सहकारी खरेदी-विक्री संघ आणि खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (ता. २५) शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

मेळाव्याला माजी कृषिमंत्री शरद पवार उपस्थित राहणार असून गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील अध्यक्षस्थानी असणार आहेत.

यावेळी सहकारमंत्री ना. बाळासाहेब पाटील, राज्यमंत्री ना. दत्तात्रय भरणे, खासदार डॉ. अमोल कोल्हे, माजी खासदार शिवजीदादा आढळराव पाटील, आमदार दिलीपराव मोहिते-पाटील उपस्थित राहणार आहेत.

सहकारमहर्षी साहेबरावजी सातकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण आणि हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या विस्तारित नूतन इमारतीचे भूमिपूजन यानिमित्ताने या मेळाव्याचे आयोजन केले असल्याची माहिती खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे-पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, खेड तालुका सहकारी खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष राजाराम लोखंडे यांनी दिली.

Hello Pune Gramin
Page No. 4 Dec 23, 2021
Powered by: erelego.com

# राजगुरूनगरात शरद पवार काय बोलणार?

## शनिवारच्या मेळाव्याकडे सगळ्यांचे लक्ष

**राजगुरूनगर, दि. २२ (प्रतिनिधी)** - राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार शनिवारी (दि. २५) राजगुरूनगरात येणार असून ते शतकरी मेळाव्यात मार्गदर्शन करणार आहेत. त्यामुळे या मेळाव्यात ते काय बोलणार याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.

खेड तालुका सहकारी खरेदी-विक्री संघ आणि खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि. २५) दुपारी १२. ३० वाजता सहकारमहर्षी साहेबरावजी सातकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण, हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या विस्तारित नूतन इमारतीचे भूमिपूजन पवार यांच्या हस्ते होणार आहे. हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी बुधवारी (दि. २२) पत्रकार परिषदेत दिली. यावेळी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, खेड तालुका सहकारी खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष राजाराम लोखंडे यांनी पत्रकार परिषद घेत माहिती दिली. याप्रसंगी संस्थेचे संचालक बाळासाहेब सांडभोर, राजेंद्र टाकळकर, सतीश नाईकरे, प्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते.

गृहमंत्री दिलीपराव वळसेपाटील यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा होणार असून सहकारमंत्री बाळासाहेब पाटील, राज्यमंत्री दत्तात्रय भरणे, खासदार डॉ. अमोल कोल्हे, माजी खासदार शिवजीराव आढळराव पाटील, आमदार दिलीप मोहिते पाटील आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. पुणे-नाशिक रस्त्यावरील खरेदी-विक्री संघाच्या पेट्रोल पंपावर सहकारमहर्षी साहेबराव सातकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण होणार आहे. त्यानंतर पाहुणे महाविद्यालयात नूतन इमारतीच्या भूमिपूजनासाठी येणार आहेत. महाविद्यालयातच शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

**दै. प्रभात**

वर्ष : १४०
केसरी

# खेड तालुक्यात पवारांच्या उपस्थितीत शेतकरी मेळावा

**राजगुरुनगर, (वार्ताहर) :** खेड तालुका सहकारी खरेदी विक्री संघ आणि खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी २५ डिसेंबर रोजी दुपारी १२.३० वाजता सहकार महर्षी साहेबरावजी सातकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण आणि हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या विस्तारित नूतन इमारतीचे भूमिपूजन व भव्य शेतकरी मेळाव्याचे आयोजन , माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांच्या शुभहस्ते होणार आहे.

यावेळी गृहमंत्री दिलीपराव ळसे पाटील, सहकारमंत्री ाळासाहेब पाटील, राज्यमंत्री दत्तात्रय भरणे, खासदार डॉ. अमोल कोल्हे, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, आमदार दिलीप मोहिते पाटील उपस्थितीत राहणार असल्याची माहिती खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, संस्था उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, खेड तालुका सहकारी खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष राजाराम लोखंडे यांनी दिली.

सहकार महर्षी साहेबरावजी सातकर यांच्यावरील प्रेम व्यक्त करण्यासाठी व त्यांच्या राजकारण, समाजकारण व सहकारातील कर्तृत्वाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी तालुक्यातील सर्व जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत, विकास सोसायटी, दूध संस्था, सहकारी बँका, पतसंस्था व विविध सामाजिक संस्थांचे आजी माजी पदाधिकारी, सर्व शेतकरी बांधव, सामाजिक कार्यकर्ते, महाविद्यालयातील आजी माजी विद्यार्थी, महिला भगिनींनी या कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन खेड तालुका सहकारी खरेदी विक्री संघ आणि खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# सहकारमहर्षी साहेबराव सातकर यांच्या पुतळ्याचे अनावरण

राजगुरुनगर, दि. २२ (सा. वा.) – खेड तालुका सहकारी खरेदी–विक्री संघ व खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, २५ डिसेंबर रोजी दुपारी १२.३० वाजता पुणे–नाशिक महामार्गावरील केंद्रीय कांदा संशोधन केंद्रासमोरील खरेदी–विक्री संघाच्या पेट्रोलपंपाच्या आवारातील सहकारमहर्षी साहेबरावजी सातकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण राष्ट्रवादीचे अध्यक्ष, खासदार शरद पवार यांच्या हस्ते होणार आहे. त्यानंतर हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या विस्तारित नूतन इमारतीचे भूमिपूजन करून शेतकरी मेळाव्याला पवार मार्गदर्शन करणार आहेत.

गृहमंत्री दिलीप वळसे–पाटील, सहकारमंत्री बाळासाहेब पाटील, राज्यमंत्री दत्तात्रय भरणे, खासदार डॉ. अमोल कोल्हे, शिवसेना उपनेते शिवाजीराव आढळराव–पाटील, आमदार दिलीपराव मोहिते यांची उपस्थिती असणार आहे, अशी माहिती खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे–पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संघाचे अध्यक्ष राजाराम लोखंडे यांनी दिली. बाळासाहेब सांडभोर, राजेंद्र टाकळकर, सतीश नाईकरे, प्रा. डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे यावेळी उपस्थित होते.

**दै. सामना**

गांवकरी

# तालुक्यात शनिवारी शरद पवारांचा शेतकरी मेळावा

राजगुरुनगर
गांवकरी प्रतिनिधी





खेड तालुका सहकारी खरेदी विक्री संघ आणि खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि. २५ डिसेंबर) दूपारी १२.३० वाजता सहकारमहर्षी साहेबरावजी सातकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण आणि हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या विस्तारित नूतन इमारतीचे भूमिपूजन व भव्य शेतकरी मेळाव्याचे आयोजन माजी केंद्रीय कृषिमंत्री शरदरावजी पवार यांच्या शुभहस्ते आणि गृहमंत्री दिलीपराव वळसेपाटील यांच्या अध्यक्षतेखाली आणि सहकारमंत्री बाळासाहेब पाटील, राज्यमंत्री दत्तात्रय भरणे, खासदार डॉ. अमोल कोल्हे, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, आमदार दिलीपराव मोहिते पाटील आदि मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत होणार असल्याची माहिती खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, संस्था उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, खेड तालुका सहकारी खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष राजाराम लोखंडे यांनी दिली. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत बोलत होते. याप्रसंगी संस्थेचे संचालक बाळासाहेब सांडभोर, राजेंद्र टाकळकर, सतीश नाईकरे, प्राचार्य डॉ. व्ही.डी. कुलकर्णी, डॉ. एच.एम.जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते.

शरदराव पवार यांच्या शुभहस्ते पुणे-नाशिक महामार्गावरील खरेदी-विक्री संघाच्या पेट्रोल पंपावर सहकारमहर्षी साहेबराव सातकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण होणार आहे. त्यानंतर मान्यवर पाहुणे महाविद्यालयात नूतन इमारतीच्या भूमिपूजनासाठी येणार आहेत. महाविद्यालयातच शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

सहकारमहर्षी साहेबरावजी सातकर यांच्यावरील प्रेम व्यक्त करण्यासाठी व त्यांच्या राजकारण, समाजकारण व सहकारातील कर्तृत्वाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी तालुक्यातील सर्व जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत, विकास सोसायटी, दूध संस्था, सहकारी बँका, पतसंस्था व विविध सामाजिक संस्थांचे आजी माजी पदाधिकारी, सर्व शेतकरी बांधव, सामाजिक कार्यकर्ते, महाविद्यालयातील आजी माजी विद्यार्थी, महिला भगिनींनी या कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन खेड तालुका सहकारी खरेदी विक्री संघ आणि खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक

# शनिवारी शरद पवारांचा शेतकरी मेळावा

**राजगुरुनगर (दै. संध्या) :**

खेड तालुका सहकारी खरेदी विक्री संघ आणि खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि. २५ डिसेंबर) दुपारी १२.३० वाजता सहकारमहर्षी साहेबरावजी सातकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण आणि हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या विस्तारित नूतन इमारतीचे भूमिपूजन व भव्य शेतकरी मेळाव्याचे आयोजन माजी केंद्रीय कृषिमंत्री शरदरावजी पवार यांच्या शुभहस्ते आणि गृहमंत्री दिलीपराव वळसेपाटील यांच्या अध्यक्षतेखाली आणि सहकारमंत्री बाळासाहेब पाटील, राज्यमंत्री दत्तात्रय भरणे, खासदार डॉ. अमोल कोल्हे, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, आमदार दिलीपराव मोहिते पाटील आदि मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत होणार असल्याची माहिती खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, संस्था उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, खेड तालुका सहकारी खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष राजाराम लोखंडे यांनी दिली.





ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत बोलत होते. याप्रसंगी संस्थेचे संचालक बाळासाहेब सांडभोर, राजेंद्र टाकळकर, सतीश नाईकरे, प्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. एच.एम.जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते.

शरदराव पवार यांच्या शुभहस्ते पुणे–नाशिक महामार्गावरील खरेदी–विक्री संघाच्या पेट्रोल पंपावर सहकारमहर्षी साहेबराव सातकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण होणार आहे. त्यानंतर मान्यवर पाहुणे महाविद्यालयात नूतन इमारतीच्या भूमिपूजनासाठी येणार आहेत. महाविद्यालयातच शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

सहकारमहर्षी साहेबरावजी सातकर यांच्यावरील प्रेम व्यक्त करण्यासाठी व त्यांच्या राजकारण, समाजकारण व सहकारातील कर्तृत्वाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी तालुक्यातील सर्व जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत, विकास सोसायटी, दूध संस्था, सहकारी बँका, पतसंस्था व विविध सामाजिक संस्थांचे आजी माजी पदाधिकारी, सर्व शेतकरी बांधव, सामाजिक कार्यकर्ते, महाविद्यालयातील आजी माजी विद्यार्थी, महिला भगिनींनी या कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन खेड तालुका सहकारी खरेदी विक्री संघ आणि खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

पुणे आवृत्ती — जनप्रवास — बातम्यांचा राजा
मुंबई, पुणे, सांगली, कोल्हापूर, अहमदनगर येथून एकाच वेळी प्रसिध्द

# खेड तालुक्यात शनिवारी शरद पवारांचा शेतकरी मेळावा

**राजगुरुनगर**
**जनप्रवास प्रतिनिधी**

खेड तालुका सहकारी खरेदी विक्री संघ आणि खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि. २५ डिसेंबर) दूपारी १२.३० वाजता सहकारमहर्षी साहेबरावजी सातकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण आणि हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या विस्तारित नूतन इमरतीचे भूमिपूजन व भव्य शेतकरी मेळाव्याचे आयोजन माजी केंद्रीय कृषिमंत्री शरदरावजी पवार यांच्या शुभहस्ते आणि गृहमंत्री दिलीपराव वळसेपाटील यांच्या अध्यक्षतेखाली आणि सहकारमंत्री बाळासाहेब पाटील, राज्यमंत्री दत्तात्रय भरणे, खासदार डॉ. अमोल कोल्हे, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, आमदार दिलीपराव मोहिते पाटील आदि मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत होणार असल्याची माहिती खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टेपाटील, संस्था उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, खेड तालुका सहकारी खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष राजाराम लोखंडे यांनी दिली. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत बोलत होते. याप्रसंगी संस्थेचे संचालक बाळासाहेब सांडभोर, राजेंद्र टाकळकर, सतीश नाईकरे, प्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. एच.एम.जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते.





शरदराव पवार यांच्या शुभहस्ते पुणे–नाशिक महामार्गावरील खरेदी–विक्री संघाच्या पेट्रोल पंपावर सहकारमहर्षी साहेबराव सातकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण होणार आहे. त्यानंतर मन्यवर पाहुणे महाविद्यालयात नूतन इमारतीच्या भूमिपूजनासाठी येणार आहेत. महाविद्यालयातच शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. सहकारमहर्षी साहेबरावजी सातकर यांच्यावरील प्रेम व्यक्त करण्यासाठी व त्यांच्या राजकारण, समाजकारण व सहकारातील कर्तृत्वाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी तालुक्यातील सर्व जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत, विकास सोसायटी, दूध संस्था, सहकारी बँका, पतसंस्था व विविध सामाजिक संस्थांचे आजी माजी पदाधिकारी, सर्व शेतकरी बांधव, सामाजिक कार्यकर्ते, महाविद्यालयातील आजी माजी विद्यार्थी, महिला भगिनींनी या कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन खेड तालुका सहकारी खरेदी विक्री संघ आणि खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

पुण्य नगरी

# सहकारमहर्षी साहेबराव सातकर यांच्या पुतळ्याचे खेडला उद्या अनावरण



**राजगुरूनगर** : खेड तालुका सहकारी खरेदी विक्री संघ आणि खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि. २५ )दुपारी १२.३० वाजता सहकारमहर्षी साहेबराव सातकर यांच्या पूर्णाकृती पुतळयाचे अनावरण करण्यात येणार आहे.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या विस्तारित नूतन इमारतीचे भूमिपूजन व भव्य शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून याचे उद्घाटन माजी कृषिमंत्री शरद पवार यांच्या हस्ते होणार आहे.गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम होणार आहेत. यावेळी सहकारमंत्री बाळासाहेब पाटील, राज्यमंत्री दत्तात्रय भरणे, खासदार डॉ. अमोल कोल्हे, माजी खासदार शिवाजी आढळराव पाटील, आमदार दिलीप मोहिते पाटील आदी उपस्थित राहणार आहेत. अशी माहिती खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष राजाराम लोखंडे यांनी दिली. याप्रसंगी संस्थेचे संचालक बाळासाहेब सांडभोर, राजेंद्र टाकळकर, सतीश नाईकरे, प्राचार्य डॉ. व्ही.डी. कुलकर्णी, डॉ. एच.एम.जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते.

**Smart Pimpri-Chinchwad**
Page No.1 December 24, 2021

**डॉ. संजय शिंदे**
**प्रसिद्धी विभाग प्रमुख**